आपला
# वार्ताहर

पान ३ वर

मुंबई, वर्ष १४, अंक ११० ★★★, गुरुवार ३१ जानेवारी २००८, पाने १०, किंमत २.०० रु.

जी बाळाच्या
ळी निळसर
त्याला ताप
ळाळाठिक्कर
आणि डॉ. भट
नी कौशल्या
ले. तेथे एक
ण्यात आली.
सुधारणा झाली
सेंबर रोजी
ताने ती हात
ण्यात आला.
णू दुःखाची
डॉ. गोसावी
दाम्पत्य तक्रार

लगर्जीपणाचा
नाहे. सलाईन
बाळाचा हात
च्ये वैद्यकीय
. हातातल्या
ल्या गुठळ्या
गँगरीन झाले.
विण्यासाठी
शस्त्रक्रिया
गला, असा
यांनी केला.
ळी कोपरी
देश गोसावी,
डॉ. गीता भट

# अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १४वे अधिवेशन फिलाडेल्फियात!

मुंबई, दि. ३० – जागतिकीकरणाच्या या युगात महाराष्ट्रातल्या शहरी भागातील दर ५ ते ६ घरांमागे एक तरी व्यक्ती आज अमेरिकेत आहे. अमेरिकेत असलेल्या अंदाजे २ लाख मराठी माणसांच्या भारतातील मित्रमंडळींना आणि आप्तेष्टांना नेहमीच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाबद्दल उत्सुकता असते. अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या १४ व्या द्विवार्षिक अधिवेशनाची तयारी सुरू झाली असून, हे अधिवेशन २ ते ५ जुलै २००९ या काळावधीत फिलाडेल्फिया येथे भरणार असल्याची माहिती अधिवेशनाचे संयोजक मुकुंद कुटे, सहसंयोजक मंदार जोगळेकर, किरण जोगळेकर, अनिल नेरूरकर यांनी दिली.

२ ते ५ जुलै २००९ रोजी फिलाडेल्फिया येथे आयोजित करण्यात आलेल्या या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात महाराष्ट्र आणि गोव्यातून अंदाजे १ हजार जणांची आणि उत्तर अमेरिकेतून अंदाजे ५ हजार जणांची उपस्थिती अपेक्षित आहे. महाराष्ट्र, गोवा, आणि पेन्सिल्व्हेनिया न्युजर्सी मधील उद्योजकांकरिता १०,००० चौरस फूटाच्या वातानुकुलित दालनात ४०० ते ५०० स्टॉलचे भव्य असे ट्रेड फेअर एक्स्पोचे आयोजन हे या अधिवेशनाचे खास आकर्षण असणार आहे. २ जुलै २००९ रोजी उद्योजकांकरिता उद्यम परिषद आणि डॉक्टरांकरिता वैद्यकिय परिषद आयोजित करण्यात आली असून या परिषदांसाठी ५०० ते ६०० उद्योजक आणि डॉक्टर्स भारतातून सहभागी होणे अपेक्षित आहेत. फिलाडेल्फिया अधिवेशनाला जाणे सोईचे होण्यासाठी पुणे आणि मुंबई येथे कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. ट्रेड फेअर एक्स्पो स्टॉलसची बुकिंग, व्हिसा आमंत्रण यासाठी लागणारी मदत या कार्यलयातून करण्यात येणार आहे. सात वेगवेगळ्या सभागृहामध्ये ४ दिवसात ६० ते १०० विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. या कार्यक्रमांसाठी महाराष्ट्र व गोव्यातून ५० टक्के कार्यक्रम निवडले जाणार आहेत. ज्यांना या कार्यक्रमात सहभागी होण्याची इच्छा असेल त्यांनीआपले प्रस्ताव दि १ फे ब्रु वा रि पा सू न www.bmm2009philadelphia.org वेबसाईटवरून प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या फिलाडेल्फिया अधिवेशनाच्या टुर पॅकेजची आखणीमहाराष्ट्र आणि गोमांतकातून ट्रॅव्हल कंपन्यामार्फत करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र गोवा आणि अमेरिकेतील मराठी तसेच भारतीय तरुण उद्योजकांना संधी देणारे, जुन्या आठवणींना उजाळा देणारे ,अमेरिकेत जन्मलेल्या किंवा तिथे स्थायिक असणाऱ्या तरुणांच्या कलागुणांना एक व्यासपीठ देणारे अमेरिकेतील मराठी माणूस आणि महाराष्ट्र गोव्यातील मराठी माणसांत सेतू जोडण्याचे काम करणारे असे हे अधिवेशन आहे. आर्थिक ,सांस्कृतिक वैचारिक देवाणघेवाणी करणे आणि केवळ आपल्या देशातच नाही तर अमेरिकेतील मराठी माणसांचा जय महाराष्ट्र चा आवाज सर्वदूर पोहचवणारे हे फिलाडेल्फिया अधिवेशन मराठी माणसांसाठी सुवर्णसंधीच ठरणार आहे अशी माहिती आयोजकांनी दिली. या अधिवेशनाची अधिक माहिती www.bmm2009philadelphia.org वरून तसेच किरण जोगळेकर ९८२०८२५६७०, मंदार जोगळेकर ९८८११२४३४१या क्रमांकावर संपर्क साधून मिळवता येईल .

पुणे कार्यालय: BMM2009 c/o Dhananjay Datar ६ सावली, सहवास सोसायटी लेन नं १ कावेरीनगर, पुणे. ४११०५२,दूरध्वनी:९१-२०-२५४१०२२६

मुंबई कार्यालय: BMM2009 c/o Dr.Nandita .Pradeep Palshetkar५ ३ ४ वा मज म्युच्युअल टेरेस, ऑपेरा हाऊस, मुंबई. ४००००७दूरध्वनी: ९१-२२-२३६९१३८६.

# करोड रुपये दंड

डी यांना ५
व प्रत्येकी
२ कोटी व
अशी सजा
ाको याला
व १ लाख
दंड अशी

ला बनावट
सामिलनाडू
होते.
गैरप्रकार
रणी गेल्या
सीबीआय
ालू होती.
आरोपी हे
तुरुंगात

असल्याने सदर खटल्याच्या सुनावणीत त्यांना व्हिडीओ कॉन्फरसिंग सिस्टीमद्वारे सहभागी करून घेण्यात आले. आज निकालावेळीही या सिस्टीमचा वापर करण्यात आला. बनावट मुद्रांक घोटाळ्याचा सूत्रधार अब्दुल करीम लाडसाब तेलगी हा सध्या पुण्यातील येरवडा कारागृहात असून, तेलगीला एड्स हा महाघातक रोग झाला आहे. त्याला मधुमेहसुद्धा आहे. त्याच्याविरोधात पुण्यासह महाराष्ट्रात ठिकठिकाणी केसेस दाखल आहेत. त्या खटल्यांची सुनावणी चालू आहे.